अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
०७.०८.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

वर्ष: ०७ | अंक: १८८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712

# एकनाथ शिंदे यांची मोदी, शहा यांच्याशी भेट

## महायुतीतील मतभेदांच्या चर्चा फेटाळल्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेण्यासाठी बुधवारी दिल्लीला गेलेल्या शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी, 'महायुती'तील मित्रपक्षांशी असलेले मतभेद सोडवण्यासाठी आपण तिथे गेलो होतो, या अफवा फेटाळून लावल्या.

'ऑपरेशन सिंदूर' आणि 'ऑपरेशन महादेव'च्या यशाबद्दल मोदींचे अभिनंदन करण्यासाठी आपण आणि आपले कुटुंबीय तिथे गेलो होतो आणि त्यानंतर आपली त्यांच्याशी स्वतंत्रपणे वैयक्तिक भेट झाली, असे महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शिवसेनेच्या खासदारांसह शिंदे यांनी अमित शाह यांचीही भेट घेतली. 'महायुती' सरकारमध्ये आपण आणि आपले सहकारी एकाकी पडल्याची किंवा कोंडीत सापडल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू असताना, गेल्या एका महिन्यात राजधानीतील त्यांची ही तिसरी भेट आहे.

मित्रपक्षांकडून आपल्याला अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले जात आहे का, असे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले असता, शिंदे यांनी उत्तर दिले की त्यांच्या पक्षाने दोन निवडणुकांमध्ये चांगली कामगिरी केली आहे आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही पक्ष विजय मिळवेल.

शाह यांनी नुकताच भारताच्या इतिहासात सर्वाधिक काळ गृहमंत्रीपद भूषवण्याचा विक्रम केला असून, त्यांनी २,२५८ दिवसांचा अखंड कार्यकाळ पूर्ण केला आहे, असे त्यांनी नमूद केले.

'त्यांचे मनापासून अभिनंदन करण्यासाठी आम्ही त्यांची भेट घेतली,' असे ते म्हणाले. शिंदे यांनी शाह यांच्या नेतृत्वाला 'निर्णायक' असे संबोधले.

तसेच, कलम ३७० रद्द करून बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण करण्यापासून ते दहशतवादाविरुद्ध 'ऑपरेशन महादेव'चे नेतृत्व करणे आणि नक्षलवादाला प्रभावीपणे आळा घालण्यापर्यंतच्या बाबींमध्ये गृहमंत्र्यांनी 'अढळ निष्ठा आणि दूरदर्शी नेतृत्व' दाखवून दिले आहे, असे त्यांनी सांगितले.

'सहकारी क्षेत्रातील विकास असो वा राष्ट्रीय सुरक्षा, त्यांचे योगदान आदर्शवत राहिले आहे,' अशा शब्दांत त्यांनी त्यांचे कौतुक केले. ठाकरे बंधू - राज आणि उद्धव - यांच्यातील संभाव्य युतीबद्दल विचारले असता, उपमुख्यमंत्री यांनी त्यांच्यावर उपरोधिक टीका केली.

# एसएसी-एसटी आरक्षणात 'क्रिमी लेयर'चे तत्त्व लागू होत नाही

## ही संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणांना लागू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, ज्यात म्हटले आहे की अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) यांच्या आरक्षणाला 'क्रिमी लेयर'चे तत्त्व लागू होत नाही. सरकारने एससी-एसटी आरक्षणात 'क्रिमी लेयर' तत्त्वाची अंमलबजावणी आणि सरकारी नोकऱ्यांसाठी अधिक न्याय्य आरक्षण धोरणाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकांना विरोध केला आहे. केंद्र सरकारने म्हटले आहे की, या याचिकांमुळे संविधानांतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत नाही. शिवाय, विद्यमान कायद्यात एससी आणि एसटी यांना 'क्रिमी लेयर'चे तत्त्व लागू करण्याची तरतूद नाही. सरकारच्या मते, ही संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणांना लागू आहे.

श्रीमंत एससी-एसटी कुटुंबांना आरक्षणाचे लाभ मिळू नयेत गेल्या वर्षी ११ ऑगस्ट रोजी, सर्वोच्च न्यायालयाने रामाशंकर प्रजापती आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावली होती. याचिकेत म्हटले आहे की, जर अनुसूचित जाती-जमाती कुटुंबातील सदस्याने यापूर्वीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पद भूषवले असेल, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचे लाभ मिळू नयेत. यामुळे आरक्षणाचे लाभ आर्थिकदृष्ट्या दुबळ आणि गरजू लोकांपर्यंत अधिक समानतेने पोहोचतील हे सुनिश्चित होईल. याचिकाकर्त्यांनी अशीही मागणी केली आहे की, आर्थिकदृष्ट्या दुबळ घटकांना उप-श्रेण्यांमध्ये निर्माण करून त्यांना प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य दिले जावे.

## थोडक्यात

### मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर भीषण अपघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंक बोगद्यात शुक्रवारी (दि.७) मध्यरात्री सुमारे १.३० वाजता भीषण अपघात झाला. पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव फॉर्च्युनरने भाजीपाला वाहतूक करणाऱ्या टेम्पोला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. भरधाव फॉर्च्युनरची टेम्पोला धडक महामार्ग पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी मध्यरात्री सुमारे १.३० वाजता फॉर्च्युनर (चक १४ चत्रः ०००७) पुण्याहून मुंबईकडे जात होती. जवळपास ९ किलोमीटर लांबीच्या मिसिंग लिंक बोगद्यात या वाहनाने भाजीपाला वाहतूक करणाऱ्या टेम्पोला मागून जोरदार धडक दिली.

# अतिरेकी विचारांचे उदात्तीकरण करणाऱ्या ११४ प्रकाशनांवर बंदी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - हिंसक अतिरेकी विचारांचे उदात्तीकरण करणाऱ्या आणि देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या तब्बल ११४ कट्टरपंथी प्रकाशने, मासिके आणि इतर आक्षेपार्ह साहित्यावर राज्य सरकारने तात्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. गृह विभागाने जारी केलेल्या राजपत्रानुसार, दहशतवादविरोधी पथकाचा (एटीएस) तपास, गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेली गोपनीय माहिती आणि सायबर सर्व्हिलन्स यातून एक धक्कादायक बाब समोर आली होती. काही विशिष्ट प्रतिबंधित दहशतवादी संघटनांशी संबंधित कट्टरपंथी साहित्य आणि डिजिटल सामग्री विविध माध्यमांतून सातत्याने प्रसारित केली जात असल्याचे निष्पन्न झाले होते. ही सामग्री हिंसक अतिरेकी विचारांचे उदात्तीकरण करते, सुशिक्षित तरुणांची माथी भडकावून त्यांना कट्टर बनवते, दहशतवादी संघटनांमधील भरतीला प्रोत्साहन देते आणि पर्यायाने राज्याचे तसेच देशाचे सार्वभौमत्व, अखंडता, सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेला गंभीर धोका निर्माण करते, असे सरकारने या अधिसूचनेत स्पष्ट केले आहे.

# टीसीएस प्रकरणात मोठी कारवाई ! 'या' नगरसेवकाला अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** - नाशिक मधील बहुचर्चित टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीत घडलेल्या लैंगिक शोषण आणि बळजबरीने धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी निदा खान हिला स्वतःच्या घरात आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याला नाशिक पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली आहे. न्यायालयाने जारी केलेल्या अजामीनपात्र अटक वॉरंट नंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

# कोचीमध्ये विमानाचे इमर्जन्सी डोअर उघडण्याचा प्रयत्न

## प्रवाशांमध्ये घबराट, केरळमधील तरुणाला अटक!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**कोची** - मलेशियाची राजधानी कुआलालंपूरहून केरळच्या कोची शहराकडे येणाऱ्या विमानात बुधवारी रात्री एका प्रवाशाच्या खळबळजनक कृत्यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली. विमान धावपट्टीवर उतरण्यासाठी (लँडिंगसाठी) अवघे काही मिनिटे शिल्लक असताना, एका ३४ वर्षीय तरुणाने विमानाचे इमर्जन्सी एझिट (आपत्कालीन दरवाजा) उघडण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने, विमानात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी आणि सहप्रवाशांनी त्याला वेळीच रोखल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव जमशीर अथाणिकल (वय ३४) असे असून, तो केरळच्या पलक्कड जिल्ह्यातील कुट्टनाड येथील रहिवासी आहे. विमान कोची आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरण्याच्या तयारीत असताना, जमशीर अचानक आपल्या जागेवरून उठला. त्याने आधी आपत्कालीन दरवाजाच्या खिडकीवर जोरात हात मारला आणि थेट दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करू लागला.

# आतापर्यंत केवळ 0.30 टक्के कुणबी जात वैधता प्रमाणपत्रे रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - मराठवाड्यामध्ये कुणबी जात वैधता प्रमाणपत्रे जाणीवपूर्वक फेटाळली जात असल्याचा मनोज जरांगे-पाटील यांचा दावा सरकारच्या आकडेवारीवरून पूर्णपणे फोल ठरला आहे. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमधील जात पडताळणी समित्यांकडे दाखल झालेल्या एकूण अर्जांपैकी आतापर्यंत केवळ ०.३० टक्के म्हणजेच अवघे ६१ अर्ज अवैध ठरले आहेत, तर या उलट तब्बल १५ हजार ५९७ अर्जदारांना कुणबी जात वैधता प्रमाणपत्रे देऊन त्यांचे दावे वैध ठरवण्यात आले आहेत. मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून कुणबी जात वैधता प्रमाणपत्रांच्या वैधतेवरून राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. बीड जिल्ह्यातील माजलगावच्या एका महिला नगरसेविकेसह काही लोकप्रतिनिधींचे कुणबी प्रमाणपत्र पुरावे आणि कागदपत्रांमधील विसंगतीमुळे अवैध ठरवण्यात आले होते.

## घरी कोणी नसल्याची संधी साधत विठठल विहार परिसरात

# भरदुपारी कुलूप फोडून ६० हजारांचा मुददेमाल लंपास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** - शहरातील विठठल विहार परिसरात घरी कोणी नसल्याची संधी साधत भरदुपारच्या सुमारास घराचे कुलूप तोडून तब्बल ६० हजार रुपयांचा मुददेमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली.

सविस्तर माहीतीनुसार, शहरातील विठठल विहार परिसरात गिरीश गुणवंत बकाले यांचे निवासस्थान असून घरी कोणी नसल्याची संधी साधत चोरटयांनी घराचे दाराचे कुलूप तोडून बेडरुमच्या आलमारीतील ५५ हजार रुपये आणि चांदाची दागिणे ५ हजार रुपये असे एकूण ६० हजार रुपयांचे साहित्य चोरुन नेले.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुध्द कलम ३३१ (३), ३०५ अ बी.एन.एस.अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.



# अयोध्येत राम मंदिर लुटीवरचे नवे रामायण भाजपने लिहिले, देवेंद्रजी आधी त्यावर बोला



## मुख्यमंत्र्यांच्या 'रामायण' चित्रपटाच्या वक्तव्यावर राऊतांची उपहासात्मक टीका

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – देशभरात सध्या नितेश तिवारी दिग्दर्शित आणि रणबीर कपूर यांनी अभिनय केलेल्या 'रामायण' सिनेमाची जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'रामायण' सिनेमाचं कौतुक केलंय. 'रामायण' सिनेमाला ऑस्कर न मिळाल्यास त्यांच्या ज्युरींपासून मी निराश होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. दरम्यान याच मुद्दयांवर बोट ठेवत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीसांवर उपहासात्मक टीका केली आहे.

'देवेंद्रजी आधी राम मंदिरातील दान पेटी चोरीवर बोला, अयोध्येत राम मंदिर लुटीवरचे नवे रामायण भाजपाने लिहिले आहे!' अशा शब्दात खासदार संजय राऊतांनी भाजप आणि देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल केला आहे. विषय राहिला ऑस्कर चा, ज्युअरी मंडळींच्या घरी लगेच ईडी आणि सीबीआय पाठवा साहेब, काम सोपे आहे. किंवा ज्युरीचा गट फोडण्यासाठी अमित शाह यांना पाठवा चिंता नाही करायची! असेही खासदार संजय राऊत म्हणाले. देशभरात एकीकडे अयोध्या राम मंदिरमधील देणगी चोरी प्रकरणाने राज्यासह देशाचे राजकारण तापले असताना पुन्हा एकदा खासदार संजय राऊतांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्राईम फोकसचे नीरज माझ्याकडे आले होते, तेव्हा अनेक अडचणींना सामोरे जात होते... अशातच, प्राईम फोकसला मोठी यंत्रणा मुंबईतून उभी करायची होती... अशातच, आम्ही पुढाकार घेतला आणि अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला.

### *'विचारमंथन' स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक प्राप्त*

# प्रेमलता भोंडे यांचा आयुक्त तुकाराम मुंढे यांचे हस्ते गौरव

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – 'विचारमंथन' स्पर्धेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक प्राप्त जि.प.च्या सेवानिवृत्त शिक्षिका प्रेमलता विजय भोंडे यांचा राज्याचे अन्न् व औषध प्रशासन आयुक्त आयएएस तुकाराम मुंढे यांचे हस्ते अमरावती



अंबानगरीत प्रथमच गौरव करण्यात आला. आलेल्या आयएएस तुकाराम मुंढे यांच्या 'संवाद तरुणाईशी' या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत 'विचारमंथन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कुटीर व खादी ग्रामोद्योग यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

ही स्पर्धा 'अ' गट शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता आणि ब गट खुला वर्गाकरिता दोन गटांत घेण्यात आली. 'ब' गटातून वरुड येथील प्रेमलता विजय भोंडे यांनी महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकाविला.

त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे वरुड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून वरुडकरांसाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

या स्पर्धेतील विजेत्या प्रेमलता भोंडे यांचा अमरावती येथे तुकाराम मुंढे यांचे हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल साहित्य, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांसह वरुडकरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### जि.प.प्राथमिक कन्या शाळा येथे

# केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे उत्साहात आयोजन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***हिवरखेड*** – जि.प.प्राथमिक कन्या शाळा येथे माहे जुलै २०२६ ची केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैशाली दारोकर होत्या तर प्रमुख अतिथी म्हणुन गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, शाळा व्यवस्थापन व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. केंद्र परिषदेचे मार्गदर्शक म्हणुन केंद्र समन्वयक सुरेंद्र वानखडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. नरेंद्र घाटोळ यांनी



प्रास्ताविकेतून युडायस पोर्टलविषयी माहिती दिली. नवोदय परीक्षेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी बसवावे असे सांगितले. स्वप्नील मगदूम यांनी शाळेला दुरुस्तीची आवश्यकता असेल तर ग्रामपंचायत कडे प्रस्ताव सादर करावा व तो पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. याप्रसंगी सालेहा सदफ, इरफान खान, सुरेंद्र वानखडे यांनी सुध्दा मार्गदर्शन केले. जि.प.प्राथ.कन्या शाळेच्या वतीने स्वप्निल मगदूम यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला तसेच सर्व शाळेचे मुख्यध्यापकांचा सुद्धा सन्मान करण्यात आला. या निमित्ताने सुरेंद्रवानखडे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ज्या शाळांचे विद्यार्थी पात्र झाले त्या शाळेतील मुख्याध्यापक व सर्वं शिक्षकांचा सन्मान केला. संचालन रुबिया यांनी तर आभार मुख्याध्यापक नरेश मोरे यांनी मानले.

### सवेरा फाऊंडेशन (भारत) संस्थेच्या वतीने

# नॅशनल इंग्लिश स्कूल येथे वृक्षारोपण



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – स्थानिक नॅशनल इंग्लिश स्कूल येथे आज सवेरा फाऊंडेशन (भारत) या सामाजिक संस्थेच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. 'पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा' या संदेशासह शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाला सवेरा फाऊंडेशन (भारत) चे संस्थापक डॉ.भारत भारती, सहसंस्थापक देवेंद्र बोडखे, संयोजक अनुप जैन, सहसंयोजक दिवाकर सिरसाम, सहसंस्थापक गुणवंत तडोकर, ऋषिकेश तेलकुटे, मुख्याध्यापक विनोद भोंगाडे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या फळझाडे आणि सावलीची झाडे लावण्यात आली. यावेळी डॉ.भारत भारती यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्व, पर्यावरण संवर्धन आणि प्लास्टिक मुक्त भारत याविषयी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक देखील या उपक्रमात सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सावेरा फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी आणि शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

### भारतीय बौद्ध महासभा शाखेच्या वतीने

# अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***शेंदुरजनाघाट*** – भारतीय बोद्ध महा सभा शाखेच्या वतीने बौध्द विहार येथे साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे जयंती व शाहू छत्रपती महाराज आरक्षण सप्ताह मोठा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरवात महामानवाचा प्रतिमेला अभिवादन व पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थानी महिला बालकल्याण सभापती प्रिया पाटील होत्या तर सुप्रसिद्ध मराठी नाट्य कलावंत विजय घाटोळे, प्रसिद्ध साहित्यिक डॉ.रवी दलाल, महेंद्र सातपुते, मिशनरी गायक अरुण सहारे, पूर्व जॉईंट डायरेक्टर सी.एस.ढवळे, नगरसेवक राकेश दवंडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रंजना पाटील, भारतीय बुद्ध महासभा अध्यक्ष रमेश कुसळे, नारायण घोरपडे, शांता गायकी, संदेश डोंगरे, गोकुळ दुपारे, कार्यक्रमात बहुसंख्य उपासक, उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भारतीय बोद्ध महासभा जिल्हा सदस्य गोपाल पाटील तर आभार रणदीप दवंडे यांनी मानले.

# वंडलीमधील पानंद रस्त्याची प्रचंड दुरावस्था

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – तालुक्यातील वंडली येथील पानंद रस्त्याची दुरावस्था झाली असून शेतकऱ्यांना मोठया त्रासाला सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे या रस्त्याची पाहणी करुन सबंधितांवर कारवाही करावी, अशी मागणी वंडलीचे सरपंच सुखदेव उईके यांनी जि.प.बांधकाम अभियंता यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद केले आहे की, वंडली येथील

### सरपंच सुखदेव उईके यांची संबंधितांवर कारवाहीची मागणी

पानंद रस्त्याचे बांधकाम २०२५-२६ मध्ये करण्यात आले असून हे काम योग्य प्रकारे करण्यात न आल्यामुळे रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली आहे, त्यामुळे या रस्त्याने शेतात ये-जा करणाऱ्या शेतकऱ्यांना पायदळ चालण्यास व बैलबंडी नेण्यास मोठी अडचण निर्माण होत आहे. राजेंद्र मातकर यांचे शेतापासुन ते बन्सोड ते जुनी वंडलीपर्यंतचा रस्ता, वंडली येथील पानंद रस्त्यामध्ये सिमेंट पायल्या टाकलेल्या नाही त्यामुळे पाणी रस्त्यामध्ये जमा होत आहे, पादंन रस्त्यामध्ये खडडे पडलेले आहेत, वंडली येथील सर्व पादंन रस्त्यांची संपुर्ण पाहणी करुन सबंधितांवर कारवाही करावी, अशी मागणी सरपंच सुखदेव उईके यांनी केली आहे.



### आषाढी एकादशीच्या पवित्र सणानिमित्त

# नॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये भव्य विठ्ठल भक्ती रॅली

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – नॅशनल इंग्लिश स्कूल, वरूड येथून भव्य विठ्ठल भक्ती रॅली काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात शाळेच्या प्रांगणात श्री विठ्ठल पूजन करून करण्यात आली. टाळ आणि विठ्ठल नामाच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. 'बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमले होते.

या रॅलीला शाळेचे मुख्याध्यापक विनोद भोंगाडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षिका



उपस्थित होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सरी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. लहानग्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून विठ्ठल, रुक्मिणी आणि वारकऱ्यांचा वेष साकारला होता.

टाळ-मृदंगाच्या तालावर विद्यार्थी विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण परिसरातून रॅली निघाली. या रॅलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक संस्कार रुजविण्याबरोबरच एकतेचा आणि शिस्तीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### न्यू इंग्लिश हायस्कूल वरुडच्या एसएससी ७८ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांकडून

# देशबंधुदास वाचनालयाला संत साहित्याच्या पुस्तिका भेट

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – न्यू इंग्लिश हायस्कूल वरुडच्या एसएससी ७८ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांकडून संत साहित्याच्या २० पुस्तिका येथील देशबंधुदास वाचनालयाला लिलाधर बेलसरे यांच्या हस्ते सप्रेम भेट देण्यात आल्या. याप्रसंगी अनिल देशमुख हे आवर्जून उपस्थित होते.

देशबंधूदास वाचनालयाचे ग्रंथपाल चंद्रकांत चांगदे यांनी या पुस्तकांचा स्विकार केला. पत्रकार उन्मेश देशमुख



यांनी संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर लिहिलेल्या पुस्तिकांचाही या भेट दिलेल्या पुस्तकांमध्ये समावेश आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित वारकरी संतांची अंधश्रद्धा निर्मूलनावरील विवेकी ग्रंथमाला भाग-१ यातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत सावता माळी, संत चोखोबा आणि कुटुंब, संत सेना महाराज, संत नरहरी सोनार, संत शेख महंमद, संत निळोबा तसेच भाग २ मधील संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई, संत कान्होपात्रा, संत निमर्ळा, संत सोयरा, संत गोरा कुंभार, संत सोपानदेव, निवृत्तीनाथ, संतांची मांदियाळी -१, संतांची मांदियाळी -२, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशी एकंदरीत २० पुस्तिका याप्रसंगी भेट देण्यात आल्या.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारीणी सदस्य प्रा.प्रवीण देशमुख व सुरेखा देशमुख यांनी या कार्यात पुढाकार घेतला. संतांचे कार्य पुढील पिढीपर्यंत जावे, हा या पुस्तिका भेट देण्यामागील उद्देश असल्याचे सुरेखा देशमुख यांनी सांगितले.

# संपादकीय

**स्वतःची तुलना कोणाशीही करु नका, कारण प्रत्येक फूल आपल्या वेळीच फुलते.**

## रस्ते, नाले आणि स्वच्छता : नागरिकांची जबाबदारी कुठे?

शहर असो वा गाव, विकासाची पहिली ओळख होते ती रस्ते, नाले आणि स्वच्छतेच्या व्यवस्थेवरून. चकचकीत इमारती, मोठमोठे विकास प्रकल्प आणि आकर्षक प्रवेशद्वार उभारून शहराचा विकास झाल्याचे चित्र निर्माण करता येते; मात्र रस्त्यावर पडलेला कचरा, तुंबलेले नाले, साचलेले पाणी आणि खड्ड्यांनी भरलेले रस्ते या वास्तवाकडे दुर्लक्ष करून विकासाचा दावा करणे म्हणजे स्वतःचीच फसवणूक होय. स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच नागरिकांची जबाबदारीही मोठी आहे. प्रश्न एवढाच आहे की, आपण आपल्या हक्कांबद्दल जितके जागरूक आहोत, तितके आपल्या कर्तव्यांबद्दल आहोत का? पावसाळा सुरू झाला की अनेक शहरांमध्ये आणि गावांमध्ये नाले तुंबण्याची समस्या निर्माण होते. पावसाचे पाणी रस्त्यावर साचते, घरांमध्ये शिरते आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यानंतर नागरिकांकडून नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीवर टीका केली जाते. प्रशासनाने नाले साफ केले नाहीत, कचरा उचलला नाही, रस्त्यांची दुरुस्ती केली नाही, अशा तक्रारी केल्या जातात. या तक्रारी चुकीच्या नाहीत. सार्वजनिक सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारीच आहे. मात्र या समस्येच्या मुळाशी नागरिकांच्या काही चुकीच्या सवयी आहेत, हेही मान्य करावे लागेल. नाले कचऱ्याने तुंबण्यामागे केवळ सफाई यंत्रणेचा दोष नसतो. प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, कागद, खाद्यपदार्थांचे अवशेष आणि इतर कचरा अनेकदा रस्त्याच्या कडेला किंवा नाल्यांमध्ये टाकला जातो. काही ठिकाणी घरगुती कचरा थेट नाल्यात टाकण्याची प्रवृत्ती दिसून येते. मग पावसाचे पाणी वाहून जाण्यास मार्गच उरत नाही. नाला तुंबल्यानंतर मात्र प्रशासनाला दोष देणे सोपे जाते. त्यामुळे प्रश्न प्रशासनाचा की नागरिकांचा, असा वाद घालण्यापेक्षा दोघांचीही जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. स्वच्छ शहरासाठी केवळ सफाई कामगारांची संख्या वाढवून उपयोग नाही. नागरिकांनी कचरा कुठे आणि कसा टाकायचा, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे आणि घरातील कचरा अधिकृत संकलन व्यवस्थेकडे देणे या साध्या गोष्टी प्रत्येक नागरिक करू शकतो. स्वच्छता ही केवळ नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे, ही मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. रस्त्यांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. खराब रस्त्यांबाबत नागरिकांनी आवाज उठवायलाच हवा. निकृष्ट दर्जाचे काम झाले असेल तर संबंधित यंत्रणेला जाब विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. मात्र रस्त्यावर अतिक्रमण करणे, बांधकाम साहित्य रस्त्यावर टाकणे, वाहतुकीचे नियम न पाळणे किंवा सार्वजनिक जागेचा वैयक्तिक वापर करणे यामुळेही शहरातील वाहतूक आणि रस्त्यांची अवस्था बिघडते. सार्वजनिक रस्ता हा कोणाच्याही वैयक्तिक मालकीचा नसतो, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. आज अनेक शहरांमध्ये अतिक्रमण ही मोठी समस्या बनली आहे. दुकानांसमोरील जागा, फुटपाथ, रस्त्याच्या कडेला असलेली मोकळी जागा यांचा वापर व्यवसायासाठी किंवा पार्किंगसाठी केला जातो. परिणामी पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते आणि वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने अतिक्रमण हटवावे, ही मागणी योग्य आहे; परंतु प्रशासनाने कारवाई केल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होणार नाही, यासाठी नागरिक आणि व्यापाऱ्यांनीही सहकार्य करणे गरजेचे आहे.

# टिफीन




'ताई सर्वात चांगला टिफीन तुझ्याकडचा असायचा. किती छान भाज्या बनवते तु'. सुनीता आपली मावशी ललिताला सांगु लागली. हे ऐकून ललिताने फक्त एक स्माईल दिली. ती सुनीताच्या ह्या वाक्यावर काहीच बोलली नाही पण ललिता मावशीला सुनीताचं बोलणं आवडलं नाही हे तिच्या चेहऱ्यावरून ओळखायला येतं होतं.

सुनीताची मुलगी दवाखान्यात भरती होती तेव्हा तिचे नातेवाईक जेवणाचा डबा घेऊन आळीपाळीने येत होते. त्यात ललिता मावशीकडचा सुद्धा कधीकधी डबा यायचा. सर्वच नातेवाईक आपलेपणाने टिफीन आणायचे. त्यातील काही नातेवाईक साधारण परिस्थितीत जगत असून सुद्धा अतिशय जिव्हाळ्याने टिफीन पोहचवण्याचे काम करत होते. ललिता मावशी श्रीमंत असल्यामुळे तिच्याकडच्या जेवणाची स्तुती सुनीता करत होती पण ईतर नातेवाईक जे टिफफीन घेऊन यायचे ते सुद्धा ललिता मावशीचेच नातेवाईक असल्यामुळे आपल्या नातेवाईकांकडच अन्न निकृष्ट दर्जाचं असतं असे सुनीताला म्हणायचे आहे, असा समज ललिता मावशीचा झाला. पण ती काही बोलली नाही.

पुढे एक महिन्यानंतर सुनीताच्या मुलीला पुन्हा दवाखान्यात चार दिवसाकरिता भरती करण्यात आले. ह्यावेळी मात्र ललिता मावशीने एकही दिवस जेवणाचा डबा दवाखान्यात सुनीता करिता पाठवला नाही. ईतर तीन नातेवाईक आळीपाळीने टिफीन घेऊन जायचे. आपली मावशी ह्यावेळी आपल्याकरिता टिफीन का पाठवत नाही याचा विचार सुनीता करीत होती. मावशी कडचा टिफीन यावा, असं सुनीताला वाटत होतं. मावशीला विचारावं असं सुनीताला वाटत होतं.पण मावशीला काही तरी अडचण असेल किंवा स्वयंपाक करणारी बाई सुटीवर असेल म्हणुन कदाचित मावशीला जमत नसेल, असा विचार करुन सुनीता स्वतःची समजूत काढून घेतं असे.

चार दिवसानंतर सुनीताच्या मुलीला दवाखान्यातून सुटी झाली.त्यावेळी मावशी मुलीकरिता फक्त फळे घेऊन आली आणि सुनीताला म्हणाली 'आता तुझी मुलगी ठणठणीत झाली आहे. घरी गेल्यावर तिची काळजी घे. मी पुढच्या हप्त्यात तुझ्या गावी येणार आहे'. सुनीता गाडीत बसून आपल्या गावाला जायला निघाली पण तिचं मन स्थिर नव्हतं. आपलं काहीतरी चुकलं असावं म्हणून मावशी आपल्यासोबत परक्यासारखी वागली हेच विचार सतत तिच्या मनात येतं होते.

एक हप्त्यानंतर मावशी सुनीताच्या गावी आली. सोबत बिमार होती त्या मुलीकरिता भरपूर फळे आणलीत. सुनीताने मावशीला चहा दिला. चहा पिऊन झाल्यावर ती सुनीताला म्हणाली ' मला लवकरच गावी परत जायचे आहे. घरी काम असल्यामुळे मी जास्त वेळ थांबू शकत नाही त्यामुळे तू जेवणाच्या भानगडीत पडू नको'. हे ऐकल्या बरोबर सुनीता एकदम उदास होऊन मावशीला म्हणाली 'मावशी माझं काही चुकलं का गं? मी बघत आहे तू माझ्याशी पूर्वीसारखी बोलतं नाहीस'. आता मात्र मावशी स्पष्ट बोलु लागली, ' हे बघ सुनीता सर्वांचीच आर्थिक परिस्थिती चांगली नसते. तशाही परिस्थितीत जर कोणी आपल्याला चार घास अन्न पुरवित असेल तर त्या अन्नाचा दर्जा ठरवण्याचा आपल्याला अधिकार नसतो. पहिल्यांदा तू दवाखान्यात आली होती तेव्हा तु मला म्हणाली होती की, 'मावशी तुझ्याकडचा टिफीन सगळ्यात चांगला असतो'. ते तुझं म्हणणं मला आवडलं नाही. माझ्याकडच्या अन्नाची स्तुती केल्यामुळे मला खूप चांगलं वाटलं असेल असा तुझा समज त्यावेळी झाला असेल. पण मुळातून मला तुझ्या त्या वाक्याचा खुप राग आला होता. ज्या तीन घरचे लोकं डबे पाठवित होते त्यांना किती त्रास झाला असेल. सकाळी उठून तुम्हा तिघांचा स्वयंपाक करुन जेवणाचा डबा घेऊन ते दवाखान्यात येत होते आणि त्या बिचाऱ्यांना हे माहीतच नाही की तु त्यांच्या घरच्या अन्नाचा दर्जा ठरवतं होती जर त्यांना हे माहीत असतं तर जशी मी डबे आणणे बंद केले होते तसे त्यांनी सुद्धा बंद केले असते. काहीही म्हण सुनीता तू नकळतपणे त्या गरीबांची मनं दुखावलीत. त्यांच्या गरिबीची ती चेष्टा होती. कुणातरी एकच घरुन तुझ्याकरिता टिफफीन आला असता तर तुला अन्नाची तुलना करायची संधीच मिळाली नसती. जे अन्न मिळाले असते ते तू मुकाट्याने खाल्ले असते आणि खाल्यानंतर त्याचा दर्जा सुद्धा तू ठरवला नसता. आता मात्र सुनीता ओक्साबोक्सी रडू लागली. आपल्या कोणत्या चुकीमुळे आपलं मावशी आपल्यावर नाराज होती याची तिला कल्पना आली. 'मावशी मला माफ कर गं. तेव्हा एवढी गंभीर बाब माझ्या लक्षात नाही आली'. 'हे बघ सुनीता भारतीय संस्कृतीत अन्नाला पूर्ण ब्रह्म म्हटले आहे. अन्नामुळे शरीर, मन आणि आत्म्याचे पोषण होते म्हणुन त्याला सर्वश्रेष्ठ मानल्या जाते. अन्न केवळ क्षुधाक्षमन करीत नाही तर शरीराला ऊर्जा देऊन टिकवते. अन्न हे सर्व सजीवांकरिता निसर्गाचे वरदान आहे. शेतकरी आणि अन्नपूर्णेचा आदर आपण करायला हवा. त्यामुळे अन्नाचा दर्जा ठरवण्याचा आपल्याला अधिकार नाही'. एवढ बोलून मावशी थांबली. बिमार असलेल्या मुलीजवळ जाऊन तिच्या तब्बेतीची विचारपूस करू लागली. उदास चेहऱ्याने सुनीता मावशीजवळ आली. 'मावशी जेवण करुन जा, तू तुझ्या घरुन यायला निघाली तेव्हाच काकांचा मला फोन आला होता त्यामुळे तू यायच्या आधीच मी स्वयंपाक केला आहे. माझ्याबद्दलचा राग डोक्यातून काढून टाक. आज तू मला एक चांगला संदेश दिला. त्याबद्दल तुझे उपकार मी विसरणार नाही. तू तुझ्या भावना माझ्याजवळ व्यक्त केल्या हे खूप चांगले झाले. 'तू जर जेवण न करता निघून गेली तर तु मला माफ केले नाही, असे मी समजेल'.

'सुनीता अगं तुझ्या चुका तुला मी नाही सांगणार तर कोण सांगेल, चल आपण जेवण करु. मग मी गावाला परत जाते.



अरुणा भास्कर भोंडे
नागपूर
९४०४०८०५६०

# मी वाचलेला संत तुकाराम आणि प्रशासनातला पाहिलेला तुकाराम मुंडे



आज लोकप्रशासन आणि लोकशाहीची असणारी अवस्था पाहून मन अस्वस्थ होते परंतु भारतातले काही रत्न हे आजच्या युगात सुद्धा स्वातंत्र्य मिळवण्याकरता ज्या लोकांनी अहोरात्र सेवा व रक्त दिले.

त्याप्रमाणे त्यातला एक तुकाराम असे मला जाणवले. तुकाराम मुंडे हे मुळ बीड जिल्ह्यातले अतिशय गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. मोठा भाऊ डेप्युटी कलेक्टर वडील थोडी फार शेती करणारे, अशिक्षित मोठा भाऊ शिकावा आणि लहान तुकारामांनी शेती करावी, या तत्त्वाचे वडील दोघा भावांमध्ये ११ वर्षाचे अंतर परंतु मोठा भाऊ जवळच शहरात शिकायला गेल्यानंतर त्यांना असे जाणवले की, तुकाराममध्ये सुद्धा शिक्षणाची आवड आहे म्हणुन एक दिवस त्यांनी तुकारामला सांगितलं की, उद्या आपल्याला शहरात जायचं आहे, कुणालाही सांगायचं नाही, सकाळच्या गाडीवर आपण जाऊ रामायणातल्या लक्ष्मण प्रमाणे तुकाराम त्यांनी मोठ्या भावाचं म्हणणं ऐकलं आणि सकाळच्या गाडीवर दोघेही भाऊ शहराकडे वळले. पुढे भावाला मिळणारी थोडकी घरून येणारी मिळकत त्यात दोघाभावांनी कसे राहायचे परंतु शिक्षणाचे ध्येय असल्या कारणाने त्यांनी वेळप्रसंगी अर्धपोटी राहून घरुन आणलेले मीठ मिरची खाऊन शिक्षण पूर्ण केले.

त्यात मोठे भाऊ डेप्युटी कलेक्टर झाले. तुकाराम आज्ञा पालन करणारा, त्याला कलेक्टर काय असते माहित नव्हते परंतु मोठ्या भावाने सांगितले ते आपल्याच करिता या ध्येयाने वेळा झालेला तुकारामने एम.ए.राज्यशास्त्र केले.

आत्ताच मी ऐकलेली मुलाखत त्याच्या मित्राची डॉ.मनिष गायकवाड सुरुवातीला ते मुंबईचे कॉलेजला राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून लागले नवीन तरुण मित्र एका बंद असलेल्या होस्टेलमध्ये शासकीय होस्टेलमध्ये राहायला लागले इतर मित्रान पेक्षा तुकाराम अबोल परंतु मनीष ला त्याचे गुण आवडायला लागले.

मनिष गायकवाड हे इंग्रजीचे प्राध्यापक असल्याकारणाने यूपीएससीची परीक्षा देण्याकरिता इंग्रजी व मराठी भाषा महत्त्वाची त्यामुळे त्यांची चर्चा नेहमीच होत होती आणि ते जिवलग मित्र झाले. शिक्षणासोबतच नोकरी हे दोन्ही कामे अतिशय प्रामाणिकपणे पार पडणारा तेव्हा सुद्धा शिस्तप्रिय सरळ मोकळ्या मनाने आपल मत व्यक्त करणारा तुकाराम हा मनिषला दिसला. मनिष नोकरीत संतुष्ट असणारा परंतु तुकाराम मात्र ध्येय वेळा त्यांनी चौथ्या प्रयत्नात यूपीएससी आयएएसची परीक्षा उत्तीर्ण केली आणि ते उच्चपदस्थ लोकप्रशासन अधिकारी बनले. उच्चपदावर आरोप झाल्यानंतर तडजोड ही करावी लागते परंतु तुकाराम मुंडे यांना नियमबाह्य कामे करणे शक्यच नव्हते त्यामुळे त्यांची आजपर्यंत २३ वेळा बदली झाली. आज उच्च पदावर लोकप्रशासकीय अधिकारी म्हणुन औषध व खाद्य मंत्रालयात ते अधिकारी म्हणून जे कामकाज करत आहे.

ते तरुणांना आणि लोकांना खुप आवडते त्यामुळे ते आज एक लोकनायक झालेलेआहे. मुंडे साहेबांप्रमाणेच तरुणांनी विशेषता ग्रामीण विभागातील तरुणांनी उच्च शिक्षण घेऊन आदर्श अधिकारी बनावे म्हणजे माझा महाराष्ट्र आणि भारत खरा लोकशाही प्रधान असेल, अशी स्वप्न मी पाहतो ते प्रत्यक्षात दिसेल असे वाटते. तरुणांकरिता हा लेख नक्कीच महत्त्वाचा असेल, त्यातून तुम्हाला नक्कीच प्रेरणा मिळेल.



सतीश म.केचे
सेवानिवृत्त प्राध्यापक
सुर्या नगर, वरुड

# महागाईचा वाढता भार : सामान्यांच्या जगण्याची कसरत




महागाई हा आजच्या परिस्थितीतील सर्वसामान्यांच्या जीवनाला सर्वाधिक प्रभावित करणारा प्रश्न ठरला आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना रोजच्या गरजेच्या वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याने घर चालविणे हीच मोठी कसरत बनली आहे. अन्नधान्य, भाजीपाला, दूध, औषधे, शिक्षण, वीज, प्रवास अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रातील वाढता खर्च सामान्य कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावर परिणाम करत आहे. महिन्याच्या सुरुवातीलाच मिळणारे उत्पन्न महिनाअखेरीस कुठे संपते, याचा हिशेब अनेक कुटुंबांना लागत नाही.

महागाईचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गीय आणि अल्प उत्पन्न गटाला बसतो. उत्पन्नातील मोठा हिस्सा अन्न, घरभाडे, शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होत असल्याने बचतीसाठी फारशी रक्कम उरत नाही. अचानक एखादा वैद्यकीय खर्च किंवा घरातील मोठी गरज निर्माण झाली तर आर्थिक गणित कोलमडते. भविष्यासाठी बचत करण्याऐवजी वर्तमानातील गरजा पूर्ण करण्यासाठीच पैसा खर्च होणे ही चिंतेची बाब आहे.

महागाईचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे मागणी आणि पुरवठ्यातील असमतोल. काही वेळा नैसर्गिक परिस्थिती, वाहतूक खर्च, इंधनाचे दर किंवा बाजारातील साखळीतील अडथळ्यांमुळे वस्तूंच्या किमती वाढतात. मात्र काही ठिकाणी साठेबाजी, कृत्रिम टंचाई आणि अनावश्यक मध्यस्थीमुळेही ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागतात. त्यामुळे केवळ ग्राहकांनी काटकसर करावी, एवढ्यावर प्रश्न सुटणार नाही.

महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेवर प्रभावी देखरेख ठेवणे गरजेचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत अचानक वाढ होत असल्यास त्यामागील कारणांचा शोध घेऊन साठेबाजी व कृत्रिम टंचाईवर कठोर कारवाई झाली पाहिजे. शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ आणि ग्राहकांना वाजवी दर मिळतील अशी पुरवठा व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला कमी भाव आणि ग्राहकाला जास्त भाव, अशी विसंगत परिस्थिती बदलण्यासाठी थेट बाजारपेठ, शेतकरी बाजार आणि सहकारी विक्री व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज आहे. त्याचबरोबर सामान्य नागरिकांनीही आर्थिक नियोजनाला महत्त्व दिले पाहिजे. अनावश्यक खर्च टाळणे, घरगुती बजेट तयार करणे, वस्तू खरेदी करण्यापूर्वी किंमत व गुणवत्ता तपासणे आणि शक्य तिथे बचतीच्या सवयी लावणे आवश्यक आहे. मात्र काटकसर म्हणजे जीवनावश्यक गरजांवर तडजोड नव्हे, हेही लक्षात घेतले पाहिजे.

महागाईचा सामना करण्यासाठी रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढीवरही भर देणे तितकेच आवश्यक आहे. केवळ किमती कमी करण्याचा प्रयत्न पुरेसा नाही; सामान्य नागरिकाच्या हातात स्थिर आणि पुरेसे उत्पन्न असणेही गरजेचे आहे. लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि स्थानिक रोजगाराच्या संधी वाढल्या तर कुटुंबांची आर्थिक क्षमता मजबूत होऊ शकते.

महागाई ही केवळ आकडेवारीतील वाढ नाही; ती प्रत्येक घरातील स्वयंपाकघरावर, मुलांच्या शिक्षणावर, आरोग्याच्या खर्चावर आणि भविष्यातील स्वप्नांवर परिणाम करणारी वस्तुस्थिती आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# रेस्टॉरंट्स बंद पडतील असे बोलू नका!

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंढेंना नाव न घेता तंबी**



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सावजी हा व्यवसाय विदर्भाची शान आहे. हा रोजगार हजारो कुटुंबांचा आधार असून व्यवसाय बंद पडेल किंवा या उद्योगाला बळीचा बकरा बनवले जाईल, अशी कोणतीही विधाने अधिकाऱ्यांनी करू नयेत, अशी तंबी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना दिली.

तुकाराम मुंढे यांनी अमरावती येथील एका कार्यक्रमात बोलताना, मी जर सावजी मटण खाल्ले तर महिनाभर आजारी पडेन आणि हॉस्पिटलमध्ये जावे लागेल, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानामुळे सावजी रेस्टॉरंट चालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी पत्रकारांशी बोलताना बावनकुळे यांनी मुंढे यांचे नाव न घेता त्यांना समज दिली. विदर्भामध्ये गेली तीन-चार पिढ्यांपासून सावजी रेस्टॉरंट्स अत्यंत प्रामाणिकपणे सुरू आहेत. सावजी ही मसाला आणि अन्नपदार्थ बनवण्याची एक आगळीवेगळी आणि पारंपरिक पद्धती आहे. विदर्भात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सावजीच्या जेवणाचा आस्वाद घ्यावासा वाटतो, असेही ते म्हणाले.

# मतदार अर्ज १७ ऑगस्टपर्यंत भरा! मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यात सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदारांनी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत मतदार अर्ज भरून संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा करावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने गुरुवारी केले. भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार मतदान अर्ज भरून स्वाक्षरी केलेल्या मतदारांची नावे २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदारयादीत समाविष्ट केली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

कोणत्याही व्यक्तीचे नाव एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदारयादीत नोंदवता येत नाही. त्यामुळे ज्या मतदारांची नावे एकाहून अधिक ठिकाणी असतील, त्यांनी सध्याच्या वास्तव्यास असलेल्या ठिकाणासाठीच गणनाअर्ज भरावा. इतर ठिकाणच्या अर्जावर 'आधीच नोंदणीकृत' अशी नोंद करावी.

# श्रीनिवास कुलकर्णी काळाच्या पडद्याआड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – 'डोह', 'सोन्याचा पिंपळ' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या साहित्यकृतींना वाचकांच्या मनात घर करून राहिलेले ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी (वय ९१) यांचे गुरुवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

अत्यंत मोजके पण कसदार लेखन करणारे लेखक व मौज प्रकाशनाचे साक्षेपी संपादक म्हणून त्यांनी वाचकांच्या हृदयात आपले स्थान निर्माण केले होते. फेब्रुवारीमध्ये खुब्याचे हाड मोडल्याच्या त्रासातून ते बरे झाले होते. पण, त्यानंतर त्यांची प्रकृती क्षीण होत गेली. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली.

**विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत निवडून आल्याबद्दल**

# माजी आमदार डॉ.गिरीश गांधी यांचा रविवारी सत्कार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार डॉ.गिरीश गांधी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमतांनी निवडून आल्याबद्दल वरुड मित्र परिवारातर्फे येत्या ९ ऑगस्ट रोजी शहरातील अष्टविनायक सभागृह येथे सत्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ.गिरीश गांधी म्हणजे विदर्भाच्या सांस्कृतिक विद्यापीठाचे कुलपतीच आहेत. वनराई ते असंख्य सामाजिक, सांकृतिक व साहित्य क्षेत्रात त्यांचे लक्षणीय योगदान आहे. अनेकांना ऊर्जा पुरवणारे ते हरितद्रव्य आहेत, त्यामुळे वरुड शहर व तालुक्यातील त्यांच्या मित्रपरिवाराने या सत्कार सोहळयाचे आयोजन केले आहे.

हा सत्कार सोहळा ज्येष्ठ राष्ट्रीय पत्रकार अशोक वानखडे यांचे हस्ते व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. याप्रसंगी माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहतील.

या सत्कार सोहळयाप्रसंगी सर्वश्री आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे अधिष्ठाता डॉ.कोमल ठाकरे व ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी प्रामुख्याने उपस्थित राहतील. हा सत्कार येत्या ९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता अष्टविनायक सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे, या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे प्रा.अरुण वानखडे, नगरसेवक योगेश्वर खासबागे, देवेंद्र बोडखे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक वासुदेव लांडगे, प्रा.अरुण खेरडे, प्रा.सुभाष बारस्कर, प्रा. व्ही.आर.देशमुख, प्रा.पी.के.वानखडे, प्रा.अरुण कावनपूरे, सेवानिवृत्त प्राचार्य प्रमोद गणोरकर, शशिकांत बेलसरे, पुरुषोत्तम कळमकर, रामराव वानखडे, बाजार समिती माजी उपसभापती निळकंठ आंडे, माजी जि.प.सभापती गिरीश कराळे, हिवसे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस, चंद्रकांत चांगदे, डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, सुरेश नरहरे, प्रा.अश्वपाल वानखडे, मदन नरहरे, आशिष कुबडे, उद्योजक जितेंद्र शहा, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष रितेश शहा, अनिल सुपले, अजय राठी, माजी नगरसेवक संजय कानुगो, हरिष कानुगो, व्यावसायिक गिरीश राठी, सुरेंद्र चांडक, पराग पनपालिया, श्याम खंडेलवाल, कन्नुभाई पटेल, संध्या सराटकर, रेखा आजनकर, डॉ.माया आंडे, उषा चौधरी, मंदा केवटे, ए.एम.देशमुख, के.एम.चौधरी, डॉ.मनोहर आंडे, संतोष क्षिरसागर, राजेश गांधी, रोशन माखिजा, निलेश रडके, मनोज गुल्हाने, सतीश बहुरुपी, शैलेंद्र देशमुख, मोहन साबू, नंदकिशोर टाकरखेडे, डॉ.विजय देशमुख व वरुड नगरीच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष बदला, प्रशांत किशोर यांचा सुनेत्रा पवारांना सल्ला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**'देवगिरी'वर सहा तास खलबते : सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी?**



**मुंबई** – देशातील नामवंत राजकीय रणनीतीकार आणि बिहारचे आमदार प्रशांत किशोर यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घेतलेली भेट चर्चेचा विषय ठरली.

'भविष्यात मी निवडणूक रणनीतीकार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम करावे असे वाटत असेल, तर राज्यातील विद्यमान नेतृत्व आणि प्रदेशाध्यक्ष पदाबाबत तातडीने निर्णय घ्या,' असा सल्ला प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांना दिल्याचे समजते. बिहारमधील बांकीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा पराभव करून प्रत्यक्ष राजकारणात आपला करिश्मा सिद्ध केल्यानंतर प्रशांत किशोर हे पहिल्यांदाच मुंबईत दाखल झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते खासदार पार्थ पवार हे स्वतः विशेष विमानाने प्रशांत किशोर यांना दिल्लीहून मुंबईत घेऊन आले होते.

# रक्षाबंधनानिमित्त रेल्वे डाक सेवा काउंटरवर रात्री उशिरापर्यंत बुकिंग सुविधा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**अमरावती** – रक्षाबंधन सणा निमित्ताने राखी,भेटवस्तू, पार्सल आणि इतर टपाल वस्तूंच्या बुकिंगसाठी नागरीकांच्या सोयीकरिता अमरावती रेल्वे स्थानकावरील रेल्वे डाक सेवा काउंटर दुपारी ४ ते रात्री १०.३० पर्यंत सुरु ठेवण्यात आल्याचे रेल्वे डाक सेवा नागपूरचे अधीक्षक गणेश अंभोरे यांनी कळिवले आहे.

ग्राहकांना रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर राखीचे पार्सल वेळेवर रवाना व वितरीत करता यावे म्हणून कार्यालयीन वेळेनंतरही रात्री उशिरापर्यंत रेल्वे डाक सेवा काउंटरवर बुकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या काउंटरवर ग्राहकांसाठी स्पीड पोस्ट, पार्सल सेवा, आंतरराष्ट्रीय टपाल व पार्सल सेवा उपलब्ध असणार आहेत. या सेवेचा जास्तीत-जास्त लाभ घेवून देश व परदेशातील आपल्या प्रियजनांपर्यंत राखी, भेटवस्तू, मिठाई व इतर सणासुदीच्या वस्तू वेळेवर पोहचविण्यासाठी ग्राहकांना आगावू बुकींग करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# मनोज जरांगे यांचा शिंदेंवर हल्लाबोल

**'डबलगेम' खेळत असल्याचा आरोप**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठवाड्यात कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची जात वैधता जात पडताळणी समितीने रद्द केल्यानंतर राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे.

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप करत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

जरांगे म्हणाले की, राज्यात सरकारकडून नवीन कट रचण्यात आला आहे. प्रमाणपत्र त्यांनीच द्यायचे आणि त्यांनीच रद्द करायचे. हा कट देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांकडून रचला जात आहे.

**सुप्रसिद्ध मनोविकार, संमोहन तज्ज्ञ, समुपदेशक डॉ.शिवा पुंडकर यांच्या**

# जानकी समुपदेशन सेंटरमधील नवीन प्रकल्पाचा शुभारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

















**अमरावती** – शहरातील सुप्रसिद्ध मनोविकार, संमोहन तज्ज्ञ, पुरस्कार प्राप्त समुपदेशक व प्रशिक्षक डॉ.शिवा पुंडकर यांच्या विजय कॉलनी येथे नवीन अत्याधुनिक जानकी समुपदेशन सेंटरमधील नवीन प्रकल्पाचा शुभारंभ नुकताच उत्साहात पार पडला.

या कार्यालयाचे उदघाटन प्रजपिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या जिल्हा प्रशासिका बी.के.सितादीदी, वं.माता पिता डॉ.पंजाबराव व माया पुंडकर, अभिनंदन पेंढारी मित्र मंडळाचे अध्यक्ष अभिनंदन पेंढारी, जेष्ठ समाज सेवक पुरुषोत्तम मुंधडा यांचे हस्ते करण्यात आले. यानंतर अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्तविकपर भाषणातुन डॉ.शिवा पुंडकर यांनी जानकी समुपदेशनच्या माध्यमातुन केल्या जाणाऱ्या कामकाजासंबधी विस्तृत माहीती दिली. याप्रसंगी सितादीदी, अभिनंदन पेंढारी, पुरुषोत्तम मुंदडा, नगरसेवक चंदू खेडकर यांनी भाषणातुन डॉ.शिवा पुंडकर यांचे अभिनंदन करीत त्यांचे माता पिता पंजाबराव, माया पुंडकर हे डॉक्टर असुन उच्चविद्याविभुषित आहेत, त्यांचे अभिनंदन करीत या माध्यमातून नागरिकांची चांगली सेवा घडत आली आहे व पुढे पण घडोत राहो, असे सकारात्मक मार्गदर्शन घेऊन सुदृढ समाज निर्मिती होईल, असे सांगत प्रकल्पाच्या उज्वल भविष्यासाठी आपल्या शुभेच्छा दिल्या. अभिनंदन पेंढारी यांनी डॉ.शिवा पुंडकर यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार केला.

याकार्यक्रमाला सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.प्रविण चौधरी, डॉ.स्वानंद लुंगे, डॉ.रुपेश खडसे, डॉ.भावना पुरोहित, डॉ.डाफ़े, डॉ.नरेंद्र केचे, डॉ.स्वप्नील गावंडे, डॉ.गोहाड, चंदु खेडकर, नगरसेवक गुड्डू धर्माळे, ऋषिकेश राऊत, धिरज गुल्हाने, मनिष पावडे, सोनल अग्रवाल, लोकेश गुल्हाने, मनिष कुबडे, निखिल राऊत, नितीन ठाकरे, संजय कानुगो, अशोक नानोतकर, राजीव बेसनाथे, ज्योती मॅडम, अमर कडू, राजकुमार भगत, गावंडे सर, राजाभाऊ चौधरी, प्रा.डोळस, प्रा.मिलिंद भिलपवार, पडोळे, पंकज वैराटे, संजय यादव, पंकज संगवई, नितीन नेटकर, संदीप काकडे, मोहन भोयर, विनोद चोरे, महेश निंभोरकर, संजय ठाकरे, डॉ.शिवा पुंडकर मित्रपरिवार, समाजसेवक मित्रपरिवार तसेच अनेक मान्यवर, पुंडकर परिवारातील नातलग बहुसंख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रात पुढील 3 दिवस मुसळधार पावसाचा इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून पुढील तीन दिवस काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषत: मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर, कोकण आणि मराठवाड्यात नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ७ ऑगस्ट रोजी मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो.

तसेच कोकण आणि गोव्यातही काही भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. मुंबई आणि उपनगरांमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## तरुणांवर बरळणाऱ्या कंगना रनौतची भाषा बदलली

# आता : 'जेन-झी देशाचं भविष्य...'

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**दिल्ली** – दिल्लीतील जंतर-मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर भाजप लोकसभा खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रनौतनं टीकेची राळ उठवली होती.

जवळपास अखबा देश तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभा होता, पण कंगना रनौत मात्र तरुणाईवर उलट-सुलट बरळत सुटली होती. काही दिवसांपूर्वीच जेन-झींना 'गटार जनरेशन' म्हणणाऱ्या कंगनानं 'जनरेशन झेड' बाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. पण, यावेळी मात्र कंगनाचा सूर काहीसा बदलल्याचं पाहायला मिळालं.

'जनरेशन झेड' बाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केलेल्या वक्तव्या प्रतिक्रिया देताना भाजप खासदार कंगना रनौत म्हणाली की, 'जनरेशन झेड' ही आपल्या देशाची ताकद आणि एका अर्थानं आपल्या देशाचं भविष्य आहे. मोहन भागवत अत्यंत आदरणीय आहेत आणि त्यांचं ज्ञान, अनुभव ऐकण्याची संधी आम्हाला अनेकदा मिळाली आहे. देशातील तरुण पिढी आपल्या संस्कृतीचे दूत म्हणून पुढे येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे...' झारखंडमधील विविध भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेबाबत रांचीमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनावर खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रनौतनं तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे.

# नागपूरमध्ये मुलीसोबत नको ते केलं, पोलिसांना खोलीत उत्साहवर्धक गोळ्या, पट्टा अन हातमोजे सापडले

### पोलिसांसमोर आरोपीचा माज कायम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – नागपुरातील अल्पवयीन मुलीचे अपहरण, जीवे मारण्याचा प्रयत्न आणि लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी निर्मय पाखरे संदर्भात एक नवी माहिती समोर आली आहे.

नागपुरात खळबळ उडवणाऱ्या या घटनेतील आरोपी निर्मय पाखरेने प्रकृती अस्वास्थ्या असल्याचे कारण देऊन रुग्णालयात दाखल झाला. मात्र पोलिसांनी त्याला शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असताना तिथेही तो डॉक्टरांच्या उपचाराला सहकार्य करत नसल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांसमोर आरोपीचा माज कायम दरम्यान, ३ ऑगस्टच्या रात्री पोलिसांनी त्याला पीडित मुलीला दिघोरी परिसरातील एका भाड्याच्या घरात डांबून ठेवलेल्या अवस्थेत रंगेहाथ पकडले होते. या प्रकरणी सुरुवातीला आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली होती.

मात्र त्याने पोलीस तपासात कुठलेही सहकार्य केले नव्हते. या दरम्यान त्याने प्रकृती अस्वास्थ्याचा कारण पुढे केलं होतं. त्यामुळे त्याला शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र तिथेही तो डॉक्टरांच्या उपचाराला सहकार्य करत नसल्याची बाब पुढे आली आहे. दरम्यान, काल (६ ऑगस्ट) न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे.

# दगडाने वार करून मनोरुग्ण महिलेचा खून

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




***अहिल्यानगर*** – जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तालुक्यातील कडूस गावामध्ये उषा पांडुरंग शिंदे (वय ४२) या मानसिक रुग्ण असणारया महिलेचा खून झाला आहे. ही घटना गुरुवारी घडली असून याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत शिंदे या महिलेच्या डोक्यात दगडाने वार करून तिचा खून केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांना असून याप्रकरणी नामदेव करंजुले यांच्या खबरवरून पोलिसात अज्ञात व्यक्ती विरोधात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर महिलेच्या मृतदेहाचे पीएम केल्यानंतर मृत्यूचे कारण समोर येणार आहे. भीषण अपघातात ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू दरम्यान, दुसरीकडे पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथील कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे तर तिचे पती जखमी झालेत.

# ३७० रुपयांची बिर्याणी... वादानंतर प्रणित मोरेचं 'घायल' होऊन करतोय कमबॅक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)





**मुंबई** – स्टँड-अप कॉमेडियन, बिग बॉस फेम प्रणित मोरे याचे क्राऊड वर्क शो सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. कार्यक्रमाला आलेल्या एका तरुणानं बिर्याणीवरुन सांगितलेला किस्सा गाजला आणि यामुळेच प्रणित मोरे टीकेचा धनी झाला. एवढा की, त्याला थेट एक निवेदन जाहीर करून माफी मागावी लागली. ट्रोलिंग एवढं वाढलं की, प्रणित मोरेला त्याचं इन्स्टा अकाउंट डिॲक्टिव्हेट करावं लागलं. पण, '३७० रुपयांची बिर्याणी'चा वाद पेटलेला असतानाच, प्रणित मोरेच्या शोमधलाच आणखी एक व्हिडीओ समोर आला. या व्हिडिओमध्ये डॉक्टर आणि इन्फ्लुएन्सर सेजल पवार हिनं केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीवरून सोशल मीडियावर संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर प्रणित मोरे आणि त्याच्या शोमध्ये आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या दोघांच्या अडचणी वाढल्या आणि थेट पोलिसांकडून त्यांची चौकशी होईपर्यंत प्रकरण पोहोचलं. अशातच आता हा वाद क्षमल्यानंतर प्रणित मोरे पुन्हा एकदा नव्या दमानं कमबॅक करण्यासाठी तयार आहे.

प्रसिद्ध कॉमेडियन प्रणित मोरे यानं त्याच्या ऑफिशिअल इन्स्टा हँडलवरुन पोस्ट केली आहे. त्यानं या पोस्टमधून कमबॅक करत असल्याचं जाहीर केलंय. तसेच, त्यानं यासोबतच एक कॅप्शन लिहिलंय, ज्यामध्ये त्यानं म्हटलंय की, जे झालं ते मी बदलू शकत नाही. पण, स्वत:ला पुन्हा कसं घडवायचं हे माझ्या हातात आहे... तसेच, पुढे त्यानं आपल्या शोचं नावंही सांगितलंय. मुंबईतून प्रणित मोरेच्या नव्या शोची सुरुवात होत आहे.

# राज्यात 30 हजारांहून अधिक शिक्षकांची भरती सुरू; शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांची माहिती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील रिक्त ३० हजार २०९ शिक्षण सेवक तसेच शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह यांनी गुरुवारी दिली.

शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी) -२०२५ ऑनलाइन पद्धतीने २७ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत घेण्यात आली होती. या चाचणीसाठी २ लाख २८ हजार ८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवार चाचणीस प्रविष्ट झाले असून १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांनी स्वप्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली आहे. पवित्र पोर्टलवरील जाहिरात प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदांच्या १३ हजार ३५१, महानगरपालिकांच्या १ हजार ९५४, नगर पालिका/ परिषदांच्या २८० तसेच खासगी शैक्षणिक संस्थांच्या १२ हजार १४८, याशिवाय आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळांमधील २ हजार ४२१ आणि शासकीय विद्यानिकेतन मधील ५६ अशा एकूण ३० हजार २०९ रिक्त पदांची भरती मागणी नोंदविण्यात आली आहे. यामधील १९ हजार ८८१ पदे मुलाखतीशिवाय तर खासगी संस्थांमधील १० हजार ३२८ पदे मुलाखतीसह भरावयाची आहेत, असे सिंह यांनी सांगितले.


या पदांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या १४ हजार ३२० पदांचा, इयत्ता सहावी ते आठवीच्या १० हजार १२ पदांचा, इयत्ता नववी आणि दहावीच्या ५ हजार ५१३ पदांचा तर इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या ३६४ पदांचा समावेश आहे.

उमेदवारांना पदभरतीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी आवश्यक सुविधा ६ ऑगस्ट २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांनी पदनिहाय पसंतीक्रम नोंदवून तो ११ ऑगस्ट २०२६ पर्यंत लॉक करणे आवश्यक आहे. त्यानंतर मुलाखतीशिवायच्या पदांसाठी गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही सिंह यांनी स्पष्ट केले.

# मुंबईतील मोकळ्या जागा भाजपकडून हडपण्याचा प्रयत्न

## आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मुंबईतील मोकळ्या जागांच्या मुद्द्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी भाजप आणि महायुती सरकारवर जोरदार टीका केली. भाजपच्या आमदारांशी संबंधित एका खासगी ट्रस्टला मुंबईतील १६ एकर मोकळी जागा, क्रीडा संकुल आणि म्हाडाचे दोन प्लॉट्स नाममात्र किंवा मोफत दरात देण्यात आल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

मुंबईतील सार्वजनिक जागा, मैदाने आणि भूखंड हडप करून ते बिल्डर आणि कंत्राटदार मित्रांच्या फायद्यासाठी वापरण्याचे धोरण सरकार राबवत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

मुंबईतील जी मोकळी मैदाने सामान्य नागरिक, मुले आणि खेळाडूंसाठी उपलब्ध होती, त्या ठिकाणी आता अनधिकृत प्रवेश करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा सूचनाफलक लावण्यात येत असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. महापालिकेत सत्ता असताना सकाळी ५ ते ९ आणि संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत सर्व मोकळी मैदाने नागरिकांसाठी मोफत खुली ठेवण्याचे धोरण होते, मात्र आता अनेक मैदानांवर टर्फ उभारून सामान्य नागरिकांना दूर ठेवले जात आहे, असा दावाही त्यांनी केला.

### आंदोलनाचा इशारा

१६ एकर जागा खासगी ट्रस्टला देण्याच्या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे पक्ष येत्या आठवड्यात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार आहे. या आंदोलनात सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, एनजीओ, हाऊसिंग सोसायट्या आणि मुंबईप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन आदित्य ठाकरे यांनी केले. मुंबईतील सार्वजनिक जागांचे संरक्षण करण्यासाठी मोठा जनआंदोलन उभे करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२९४/२०२६** **ने.ता.१५/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) भुषण रामरावजी वानखडे, वय अं.३६ वर्ष, धंदा-शेती रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

२) सौ.संगीता अनिलराव भांगे, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम रा.पळसोडा, ता.आष्टी, जि.वर्धा

३) कविता प्रमोद अंबाडकर, वय अं.३८ वर्ष, धंदा- घरकाम रा.अकोला, ता.जि.अकोला

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामराव महादेवराव वानखडे व मयत कुसुमबाई रामराव वानखडे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१५/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५५/२०२६** **ने.ता.१६/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुशिला नागोरावजी कोठे, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) रुपेश नागोरावजी कोठे, वय अं.४६ वर्ष, धंदा-शेती, ३) गोपाल नागोरावजी कोठे, वय अं.४३ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ ते ३ रा.बेनोडा (शहीद), ४) विजया सुनिल यावले, वय अं.५५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ५) लता संजयराव दळवी, वय अं.५२ वर्ष, धंदा- घरकाम, रा.मोहदी (दळवी), ता.नरखेड, ६) अल्का रविंद्र ठाकरे, वय अं.४९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.काटोल, ता.काटोल, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत नागोराव सखारामजी कोठे, रा.बेनोडा (शहीद), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# आंदोलन का झालं, का नाही याचं उत्तर माझ्याकडं नाही

## पण डोळे मिटून मी जेनझीवर विश्वास ठेवेन : मोहन भागवत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जेन झींचं आंदोलन का झालं, का नाही ? याची पूर्ण उत्तरं ना माझ्याकडे आहेत, ना तुमच्याकडे आहेत. मीदेखील काही वाचूनच मतं बनवतो आहे. खरं काय, खोटं काय, मला माहिती नाही असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. मला डोळे मिटून विश्वास ठेवायचं म्हंटलं, तर मी जेनझीवर डोळे मिटून विश्वास ठेवेन असेही मोहन भागवत म्हणाले. मुंबईत मोहन भागवत यांनी आज जे झीशी




संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. आयआयएमयुएनचे संस्थापक ऋषभ शाह यांनी त्यांची मुलाखत घेतली.

ऐकलं जात नसेल तर आंदोलन होत असतात आंदोलन डायलॉगचा प्रकार आहे. ऐकलं जात नसेल तर आंदोलन होत असतात. आत्ता जे झालं ते ग्रेव्हिएन्सेस आहे. शिक्षण व्यवस्थेत अनेक गोष्टी व्यवस्थित नाहीत, बदल करायला हवा असे मत मोहन भागवत यांनी व्यक्त केले. आमच्या पिढीत मोठ्यांचे ऐकत होतो. आताचे जेनझी आणि अल्फा प्रश्न विचारतात आणि त्यांना प्रेम पाहिजे. वेगवेगळे ओपिनियन यातून येत असतात आंदोलन वगैरे जेनझी यांनी करायचे नाही असं मी म्हणणार नाही. मात्र ते कसं करायचं हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात सांगितलं आहे. आंदोलन सिस्टिम करेक्शनसाठी होणं गरजेचं असेही ते म्हणाले. जे कधी व्हायला पाहिजे ते होत नाही तेव्हाच आंदोलनं होतात. जेनझी आपलीच पिढी आहे, आपलेपणा हवा. जेनझी जेन अल्फा आमच्यापेक्षा जास्त प्रामाणिक आहेत असेही ते म्हणाले.

शिक्षणासाठी ६ टक्के आर्थिक तरतूद असावी शिक्षण कमर्शिअल बिझनेस नाही, जगण्याची गरज आहे. सगळ्याच दृष्टीने याचा आता विचार व्हायला हवा असे भागवत म्हणाले आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी मनपात मानधनावर भरतीची तयारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – आगामी सिंहस्थ कुंभमळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्याच्या तयारीसाठी आणि प्रत्यक्ष कुंभमेळ्यादरम्यान पुरेसे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. त्यासाठी नाशिक महापालिकेत पुरेसे मनुष्यबळ नाही.


त्यामुळे नाशिक महापालिकेतील रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मानधन तत्वावर



कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव तयार करून स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेश सभापती मच्छिंद्र सानप यांनी प्रशासनाला दिले कामाचा अतिरिक्त ताण वाढला

सभापती मच्छिंद्र सानप यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा झाली. सभेदरम्यान, मनपातील वाढत्या मनुष्यबळाच्या कमतरतेवर चर्चा झाली. शहराचा वाढता विस्तार, वाढलेली लोकसंख्या आणि आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी लक्षात घेता सध्याचे उपलब्ध कर्मचारी अपुरे पडत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले. महापालिकेच्या मंजूर सुमारे सात हजार पदांपैकी सध्या फक्त तीन ते साडेतीन हजार कर्मचारी कार्यरत आहे. त्यामुळे विविध विभागांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे.

### सोने-चांदीचे दर



शुध्द सोने –१४९८९० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने –१३७४०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,४०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६०० – | २००० |
| गहू – | २४५० – | २६५० |
| तूर – | ७४५० – | ८००० |
| मूग – | ६८०० – | ७२०० |
| उडीद – | ६५०० – | ७१५० |
| हरभरा – | ५८०० – | ६२५० |
| सोयाबिन – | ६४०० – | ६८० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ११००० – | ११५०० |
| लालमका – | १७०० – | १८०० |

# एकमेकांना 'डॅमेज' न करण्याची महायुतीत अलिखित आचारसंहिता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्यात नुकतीच मुंबईत खलबते झाली असली तरी यामुळे महायुतीमध्ये कोणतीही फूट पडलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसला पक्षांतर्गत निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, परंतु महायुती म्हणून काम करताना भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात एकमेकांना राजकीयदृष्ट्या 'डॅमेज' न करण्याची एक अलिखित आचारसंहिता ठरलेली आहे, अशी भूमिका भाजप नेते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी मांडली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती भक्कम असून या भेटीमुळे आमच्यात कोणत्याही प्रकारची शंका निर्माण होण्याचे कारण नाही, असेही त्यांनी नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते प्रसाद लाड यांच्यावर केलेल्या टीकेचा बावनकुळे यांनी खरपूस समाचार घेतला.

# डेटा सेंटर क्षमतेत मुंबई १५व्या स्थानी

## 'नाइट फ्रँक ग्लोबल डेटा सेंटर' अहवालात आर्थिक राजधानीचा गौरव

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – एकूण कार्यरत डेटा सेंटर क्षमतेच्या बाबतीत मुंबईने जागतिक स्तरावर १५ वे स्थान पटकावले आहे, तर हैदराबाद २७ व्या क्रमांकावर आहे.

रिअल इस्टेट सल्लागार संस्था नाइट फ्रँकने गुरुवारी 'नाइट फ्रँक ग्लोबल डेटा सेंटर ॲटलस २०२६' हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात उत्तर अमेरिका, युरोप, आशिया-पॅसिफिक, मध्य पूर्व आणि आफ्रिकेतील ३६ प्रमुख जागतिक डेटा सेंटर बाजारपेठांची तुलना करण्यात आली आहे.

मुंबईने कार्यरत डेटा सेंटर क्षमतेत जागतिक स्तरावर १५ वा, तर भविष्यातील विकास प्रकल्पांच्या



(डेव्हलपमेंट पाईपलाइन) बाबतीत ११ वा क्रमांक मिळवला आहे. ७७४ मेगावॅट थेट आयटी क्षमता आणि ५ गिगावॅट पाईपलाइन क्षमतेसह, मुंबईने भारतातील प्रमुख डेटा सेंटर बाजारपेठ आणि आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील डिजिटल पायाभूत सुविधांचे एक आघाडीचे केंद्र म्हणून स्वतःला ठामपणे स्थापित केले आहे.

हैदराबाद कार्यरत क्षमतेमध्ये (१५१ मेगावॅट) जागतिक स्तरावर २७ व्या स्थानावर आहे. तर भविष्यातील विकास प्रकल्पांच्या बाबतीत ते १९ व्या क्रमांकावर (२.२ गिगावॅटपेक्षा जास्त) पोहोचले आहे. जागतिक क्रमवारीत भारताची उपस्थिती ही गोष्ट दर्शवते की देश किती वेगाने एका धोरणात्मक डिजिटल पायाभूत सुविधांच्या गंतव्यस्थानात विकसित झाला आहे. जगातील आघाडीच्या कार्यरत बाजारपेठांमध्ये मुंबईचे स्थान हे कनेक्टिव्हिटी, एंटरप्राइज मागणी आणि क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चरमधील वर्षानुवर्षांच्या गुंतवणुकीचे फलित आहे.

# 'हर घर तिरंगा' अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हा : अपर आयुक्त संजय जाधव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वाटचाली निमित्त देशभरात दि. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येणार आहे. आपल्या देशाच्या एकात्मतेचे आणि अस्मितेचे प्रतीक असलेला राष्ट्रध्वज प्रत्येक शासकीय कार्यालयांवर फडकावून या राष्ट्रीय उत्सवात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन अपर आयुक्त संजय जाधव यांनी आज येथे केले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत जाधव यांनी हर घर तिरंगा मोहिमेच्या अनुषंगाने दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, शिक्षण, महिला व बालविकास, मनपा प्रशासन आदी विभागाचे विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

शासनाच्या सूचनेनुसार महापालिका आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने या अभियानाची व्यापक तयारी करण्यात येत आहे. शहरात महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या केंद्रात तसेच इतर ठिकाणी राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्यासाठी विक्री आणि वितरण केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच, नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत जनजागृती करण्यासाठी शिक्षण, महिला व बालविकास तसेच आरोग्य विभागाव्दारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, रॅली आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

स्वातंत्र्याचा हा सोहळा केवळ एक शासकीय उपक्रम नसून, प्रत्येक भारतीयाच्या असीम देशप्रेमाची ती एक अभिव्यक्ती आहे.

